REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९२५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ — पुणें, बुधवार तारीख १९ जुलै, १९५० — अंक २९

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब थ. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५११ — तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करते:—


हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी — २ डाळीची गिरणी — ३ उसाचे चरक
४ चक्क्या — ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) — ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड
भिवंडी — जि. ठाणें
व्हाया–कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



**पांच हॉर्स पावरचें**
**डिझेल एंजीन**
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**


## विविध माहिती

**मुंबई कॉर्पोरेशनचें कर्ज**—मुंबई कॉर्पोरेशननें भांडवली खर्चासाठीं ८०,००,००० रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. कर्जाची मुदत २० वर्षांची असून व्याजाचा दर ३॥ टक्के आहे. शिवाजी पार्क येथें बांधावयाचा तलाव, के. ई. एम्. हॉस्पिटल-साठीं ब्लड बँकेची व्यवस्था, इत्यादि कामांसाठीं कर्जाचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**मुंबई सरकारच्या योजनांना अडथळा**—भारतीय सरकारनें मुंबई सरकारला पुरवावयाच्या लोखंडाच्या आणि पोलादाच्या पुरवठ्यांत ७५ टक्के कपात केली आहे. मुंबई सरकारनें चालू वर्षाच्या शेवटच्या तिमाहीसाठीं १६,७०० टनांची मागणी केली होती, परंतु फक्त ४,१५० टन पोलादच सरकारला मिळणार आहे. मुंबई सरकारनें घरें बांधण्यासाठीं ३,१२२ टनांची मागणी केली होती. ती पुरी करण्यांत येणार आहे. पोलादाच्या पुरवठ्यांत कपात झाल्यामुळें मुंबई सरकारला, लोकल बोर्डांना व म्युनिसिपालिट्यांना आपलीं कांहीं कामें स्थगित करावीं लागणार आहेत.

**लोकल बोर्डांच्या कायद्यांत दुरुस्ती**—मुंबई विधिमंडळांत येत्या अधिवेशनांत लोकल बोर्डस् आणि म्युनिसिपालिट्या ह्यांच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे. ह्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी झाल्यावर जी पहिली सभा होईल तिचें अध्यक्षपद जिल्ह्याच्या कलेक्टरनें स्वीकारावें अशी तरतूद दुरुस्तींत करण्यांत येणार आहे. नगर लोकल बोर्ड निवडणुकीचा वाद नुकताच कोर्टापर्यंत गेलेला असल्यानें वरील दुरुस्ती करण्यांत येत आहे असें समजतें.

**तत्त्वज्ञान्याला अमेरिका कशी दिसते ?**—डॉ. त्रिविक्रम ह्या तत्त्वज्ञाचें मुंबईला नुकतेंच एक व्याख्यान झालें. आपल्या नागरिकांना जीवनासासाठीं लागणाऱ्या वस्तू पुरविण्याचें प्रत्येक सरकारचें कर्तव्य आहे असें सांगून ते पुढें म्हणाले कीं, आज भारत अन्नासाठीं अमेरिकेच्या तोंडाकडे पहात आहे. पण ह्याच अमेरिकेंत दर सात मिनिटाला एक खून होत आहे आणि दर पंधरा मिनिटाला एक चोरी होत आहे. राज्यघटनांना दैवी अधिष्ठान असल्याशिवाय त्या यशस्वी होणार नाहींत.

**बँक ऑफ बडोद्याचा नफा**—ता. ३० जून १९५० रोजीं पुऱ्या झालेल्या सहा महिन्यांत या बँकेला १७,४०,३३१ रु. नफा झाला. ह्या रकमेंत मागील वर्षाचे ४,१८,१४७ रुपये वर्ग करण्यांत आलेले आहेत. कंपनीच्या चालकांनीं १० टक्के इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें ठरविलें आहे. डिव्हिडंड करमाफ आहे. त्यासाठीं ५,००,००० रु. काढून ठेवण्यांत आले आहेत.

**गुरांचे फिरते दवाखाने**—सौराष्ट्रांतील ग्रामीण विभागांत गुरांचे तीन फिरते दवाखाने उघडण्याची योजना सौराष्ट्र सरकारनें मंजूर केली आहे. ह्या योजनेसाठीं चालू सालीं ३४,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.


**मलाया हिंदुस्थान व्यापार**—१९५० अखेर संपलेल्या वर्षांत भारतानें मलायाला आयातीपेक्षां अधिक निर्यात केली असें आढळून आलें आहे. आयात-निर्यात मिळून एकूण १७,२०,००,००० स्ट्रेट्स डॉलर्स किंमतीचा व्यवहार झाला. भारतानें आयातीपेक्षां ४६,०००,००० डॉलर्स किंमतीच्या मालाची अधिक निर्यात केली. भारतानें केलेल्या निर्यातींत जवळ जवळ ७५ टक्के कापड आहे.

**तागाच्या उत्पादनांत स्वयंपूर्णता**—भारतीय सरकारच्या शेतकी खात्याचे एक अधिकारी सरदार दातारसिंग ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, पुढील वर्षीं भारत आपणांस पाहिजे तेवढा ताग पिकवूं शकेल. कापूस अधिक पिकविण्याच्या मोहिमेप्रमाणें पुढील दोन वर्षांत कापसाच्या बाबतींतही भारत स्वावलंबी होईल असाही त्यांचा अंदाज आहे.

**आंब्याचें प्रचंड झाड**—जगांतील सर्वांत मोठें आंब्याचें झाड अंबाला ( पंजाब ) जिल्ह्यांतील बारनाळा येथें आहे. पंजाबसाठीं चांदीगढ येथें नवीन राजधानी वसविली जात आहे. त्याच जमिनीच्या पट्ट्यांत हें झाड आहे. झाडाच्या बुंध्याचा घेर ३४ फूट असून त्याच्या १४ फांद्यांपैकीं एक फांदीच पूर्ण वाढ झालेल्या झाडासारखी आहे. ह्या झाडाला दरवर्षीं ४०० मण फळ येतें.

**सायकलींचा कारखाना**—सेन रॅले इंडस्ट्रीज ऑफ इंडिया लि. ही कंपनी १९५१ अखेर असनसोल येथें एक सायकलींचा कारखाना काढणार आहे असें समजतें. १९५१ च्या आरंभाला कारखान्याच्या इमारती पुऱ्या होतील असा अंदाज आहे. कंपनीनें ५० लाख रुपयांचें भांडवल विक्रीस काढलें होतें, तें सर्व खपून आतां भांडवलाची विक्री बंद करण्यांत आली आहे. रॅले सायकली आयात करून कंपनी हल्लीं समाधानकारक नफा मिळवीत आहे.

**खार जमिनीची सुधारणा**—मुंबई सरकारनें खार जमिनी सुधारण्याच्या २२ योजना आंखल्या आहेत. ह्या सर्व योजनांना १,८४,०५६ रु. खर्च येणार असून एकूण ६,५५६ एकर जमी भाताच्या पिकाखालीं येईल असें समजतें. या योजना पुऱ्या झाल्यावर ५०,००० टन अधिक तांदूळ पैदा होईल असा अंदाज आहे. योजनांच्या प्रत्यक्ष कामाला येत्या सप्टेंबरमध्यें सुरवात होईल.

# अर्थ

बुधवार, ता. १९ जुलै, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी चळवळीची प्रगति

१९४७–४८ मध्यें भारतांत सहकारी चळवळीनें केलेल्या प्रगतीची माहिती प्रसिद्ध झाली आहे, तिचेवरून आपल्या देशांत सहकारी चळवळीचा व्याप बराच वाढला आहे, हें सहज लक्षांत येईल. ही प्रगति कायम कशी राहील आणि सरकारी प्रत्यक्ष सहाय्याच्या अभावींहि तिचें कार्य कसें चालू राहील हा प्रश्न बाजूस ठेवला, तरी आतां आपल्या आर्थिक जीवनांत सहकारी संघटनेनें किती प्रवेश केला आहे हें पाहिलें तर तुलनात्मक दृष्ट्या कितीतरी समाधानास जागा आहे. मागील कांहीं वर्षांत झालेली वाढ पचनीं पडून, प्रत्यक्ष व्यवहारांत गुंतलेल्यांनींच सहकारी संघटनेचें नेतृत्व खालपासून वरपर्यंत आपल्या हातीं कार्यक्षमतेनें घेण्याचें ध्येय साध्य होण्याच्या दृष्टीनें प्रयत्न होणें अगत्याचें आहे. सहकारी कार्यकर्त्यांना ह्या दृष्टीनें कितीतरी वाव आहे. खालील तपशिलांत १९४७–४८ मधील सहकारी प्रगतीचा आढावा घेतलेला आहे.

### दक्षिण भारत सहकारी चळवळींत अग्रेसर

दुसऱ्या महायुद्धांत भारतांतील सहकारी चळवळीस उत्तेजन मिळालें असून तेव्हांपासून तिच्या स्वरूपांत, त्याचप्रमाणें तिच्या वाढीच्या वेगांत बदल होत आहे. अजूनपर्यंत शेतकीविषयक सहकारी संस्थांची संख्या सर्वांत जास्त आहे. शेतकीविषयक सहकारी संस्थांपैकीं नॉन-क्रेडिट सहकारी संस्थांच्या संख्येंत वाढ होत असल्याचें दिसून आलें असून सहकारी संस्थांपासून आपलें कल्याण होत आहे याची जनतेस जाणीव झाली आहे.

१९४६–४७ सालाशीं तुलना करतां १९४७–४८ सालीं सहकारी संस्था, त्यांचे सभासद आणि खेळतें भांडवल यांत अनुक्रमें सुमारें ३·९, १९·६ आणि ७·४ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येतें. या चळवळींत समाविष्ट असलेल्या लोकसंख्येचें प्रमाण १९४७–४८ सालीं सुमारें १६ टक्क्यांपर्यंत वाढलें होतें. १९३८–३९ व १९४५–४६ सालीं हेंच प्रमाण अनुक्रमें ६·२ व १०·६ टक्के इतकें होतें. दक्षिण भारतांत या चळवळीस जनतेचा विशेष पाठिंबा मिळाल्याचें दिसून येतें. एकूण सभासदांपैकीं तीन पंचमांश सभासद दक्षिण भारतांतील आहेत. सहकारी चळवळींत भाग घेणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण कूर्गमध्यें सर्वांत जास्त आहे. या राज्यांतील प्रत्येक महसूल खेड्यांत एकेक सहकारी संस्था असून या चळवळीनें तेथील आर्थिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत प्रवेश केला आहे. अजूनपर्यंत मुळींच सहकारी संस्था नसलेलीं संस्थानें म्हणजे कच्छ, बिलासपूर आणि त्रिपुरा हीं होत.

### क्रेडिट सोसायट्या

निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांमध्यें क्रेडिट सोसायट्यांचा पतपेढ्यांचा प्रकार अजूनही मुख्य असून त्यांत ६० कोटी रुपये खेळतें भांडवल असलेल्या एकूण भांडवलापैकीं सुमारें ७४ टक्के भांडवलाचा समावेश होतो. बहुतेक राज्यांत सहकारी अर्थकारणाची संघटना करण्यांत आली आहे. १९४७–४८ मध्यें सुमारें २५ कोटी रुपये एकूण भांडवल असलेल्या १४ प्रांतिक सहकारी बँका चालू होत्या. त्याशिवाय ५ मध्यवर्ती जमीन तारण बँका आणि २७१ प्राथमिक तारण बँका व संस्था होत्या. प्राथमिक बँकांच्या सभासदत्वांत मागील कांहीं वर्षांत बरीच वाढ झाली आहे. १९३८–३९ सालीं या बँकांच्या सभासदांची संख्या ७६,१९६ होती ती १९४७–४८ सालीं १,४६,६६४ झाली.

### खरेदी–विक्री व ग्राहक सहकारी संस्था

अनेक प्रकारच्या सहकारी क्षेत्रांत प्रगति झाली असून त्यांत खरेदी–विक्री करणाऱ्या व इतर अनेक प्रकारच्या ग्राहक सहकारी संस्थांचा समावेश आहे. विविधकार्य स्वरूपाच्या संस्थाही अस्तित्वांत आल्या आहेत. उत्तर प्रदेश आणि मुंबई या राज्यांत खरेदी–विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांच्या संख्येंत फारच वाढ झाली आहे. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशांत १९३८–३९ मध्यें या संस्थांची संख्या १,०९४ होती ती १९४७–४८ मध्यें २,७०५ झाली. तथापि, ग्राहक सहकारी संस्थांच्या क्षेत्रांत अत्यंत आश्चर्यकारक प्रगति झाली आहे. या संस्थांत वाढ होण्याचें कारण युद्धकालांत ओढवलेली अत्यंत कठीण परिस्थिती हें होय. या संस्थांचे बाबतींत, विशेषत: मद्रास, मध्य प्रदेश, मुंबई आणि आसाम या राज्यांत बरीच वाढ झाली आहे.

### सहकारी अन्नोत्पादन

सहकारी पद्धतीनें अन्नोत्पादनांत वाढ करण्याचें उद्दिष्ट ठेवून स्थापन केलेल्या शेतकी उत्पादनविषयक संस्थांच्या संख्येंतही वाढ झाली आहे. तथापि, त्या अजून प्राथमिक अवस्थेंत आहेत. या प्रकारच्या संस्थांच्या उद्दिष्टांत जमिनींचें एकीकरण, पाटबंधाऱ्यांत वाढ करणें, जमिनींत सुधारणा करणें, जमीनवसाहतीकरण आणि सुधारलेल्या पद्धतीची शेती वगैरेंचा समावेश होतो. १९४७–४८ च्या अखेरीस भारतांत जमिनींचें एकीकरण करण्याबाबतच्या सुमारें २,०३२ संस्था होत्या आणि त्यांच्या सभासदांची संख्या २,३३,००० इतकी होती.

सहकारी चळवळीच्या क्षेत्रांत सर्वांत मोठी अशी कोणती संस्था असेल तर ती सहकारी शेतकीविषयक संस्था होय. १९४७–४८ च्या अखेरीस भारताच्या निरनिराळ्या भागांत अशा प्रकारच्या २०० हून जास्त संस्था अस्तित्वांत होत्या. अशा प्रकारच्या संस्थांना खर्चाची कांहीं प्रमाणांत तरतूद आणि ग्रँटस् व तांत्रिक नोकरवर्गाचा पुरवठा करून आणि शेतकीविषयक आवश्यक वस्तूंचा पुरवठा आणि कर यांचे बाबतींत सवलतीची वागणूक देऊन प्रोत्साहन देण्यांत येत आहे. १९४८–४९ सालीं भारतांत सहकारी शेतीखालीं एकूण ४०,००० एकर जमीन होती. भारताच्या निरनिराळ्या भागांत विविधकार्य संस्थांची स्थापना करण्यांत आली असून उत्तर प्रदेशांत त्या सर्वांत जास्त आहेत. १९४५–४६ मध्यें उत्तर प्रदेशांत या संस्थांची संख्या ६,६९२ होती ती १९४७–४८ मध्यें १८,००० झाली.

## फिस्कल कमिशनचा व्यापक दृष्टिकोन

गेल्या वर्षी हिंद सरकारनें नेमलेल्या फिस्कल कमिशनचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें स्पष्टपणें दिसतें कीं गेल्या २६।२७ वर्षांत बदललेल्या आर्थिक परिस्थितीचें स्वरूप लक्षांत घेऊन व आर्थिक विचारसरणीमध्यें निर्माण झालेल्या नियोजित अर्थव्यवस्थेसारख्या कल्पना विचारांत घेऊनच कमिशननें अहवाल लिहिला आहे. अहवालांत असें स्पष्टपणें मत व्यक्त करण्यांत आलें आहे कीं जकातींच्या रूपानें नकारात्मक गोष्ट करण्यावरच भर देण्यापेक्षां औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांची परिस्थिति लक्षांत घेऊन व गेल्या कांहीं वर्षांत भौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें व्यापार, उत्पादन इ. बाबतींत झालेली महत्त्वाची स्थित्यंतरें लक्षांत घेऊन, सरकारनें औद्योगिक विकासाला पोषक होईल असें वातावरण सर्व प्रकारें निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. प्लॅनिंग कमिशनचें सुरू असलेलें कार्य विचारांत घेतां, फिस्कल कमिशनचें हें मत प्लॅनिंग कमिशनच्या कार्याला पोषक होईल.

संरक्षणाच्या प्रत्यक्ष मार्गांचा विचार करण्यासाठीं कायम स्वरूपाचें टॅरिफ कमिशन नेमावें ही सूचना आज सर्वांनाच स्वागतार्ह वाटेल अशी आहे. त्याचप्रमाणें, सरकारच्या सर्व कारभारांत एकसूत्रीपणा निर्माण करण्यासाठीं 'बोर्ड ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री' स्थापन करावें ही सूचना महत्त्वाची आहे. संरक्षण मिळालेल्या धंद्यांमध्यें योग्य प्रकारची जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी ही सूचनाहि अगदीं योग्य अशीच आहे. मालाच्या किंमती, उत्पादनाबद्दलचें धोरण, यांत्रिक व तांत्रिक सुधारणांचा अवलंब, संशोधन, धंद्याचें शिक्षण देण्याची योजना, इ. गोष्टींकडे संरक्षण मिळालेल्या धंद्यानें लक्ष पुरवावें. त्याचप्रमाणें सरकारनें भांडवल गुंतवणूक कशी होईल, साधन सामुग्रीच्या विकासावर भर देणें, औद्योगिक बाबतींत संशोधन करणें, मालाच्या दर्जाचें नियंत्रण, उत्पादनांतील एकसूत्रीपणा, वहातूक, बँकिंग इ. बाबतींत लक्ष पुरवावें.

कमिशनच्या अहवालाची व्यापक दृष्टी आणखी एका गोष्टीवरून स्पष्ट होते, ती ही कीं वर्षाला ३५ लक्ष या लोकसंख्येच्या वाढीच्या बाबीकडे कमिशननें लक्ष दिलें आहे. शेती व उद्योगधंदे यांच्या बाबतींत केवळ आज अस्तित्वांत असलेल्या परिस्थितींत यथावत् सुधारणा करण्याचें धोरण स्वीकारलें गेल्यास दरवर्षी बेकार लोकांत १५ लक्षांनीं भर पडेल असा कमिशनचा अंदाज आहे. तेव्हां वर्षाला ५० लक्ष लोकांना काम मिळवून देण्याचा प्रश्न देशापुढें असल्यामुळें कमिशनचें लक्ष शेती व बडे उद्योगधंदे यांच्यांत सुधारणा करून त्यांचें उत्पादन वाढविण्याच्या प्रश्नाकडे गेलें आहे. पूर्व युरोपांतील देश व चीन–जपान यांच्या धर्तीवर हिंदचें औद्योगीकरण शक्य होईल असा कमिशनचा अभिप्राय आहे. आर्थिक नियोजनाच्या व उद्योगधंद्यांच्या वाढीला पोषक होईल असें वातावरण योग्य प्रकारच्या आर्थिक धोरणानें व वाढत्या लोकसंख्येकडे लक्ष देऊन साध्य करणें, असा कमिशनचा दृष्टिकोन आहे.

---

**पाकिस्तान ऑस्ट्रिया व्यापार**—पाकिस्तान आणि ऑस्ट्रिया ह्या दोन देशांच्या दरम्यान व्यापारी संबंध प्रस्थापित करणें कितपत शक्य आहे ह्याची पहाणी करण्यासाठीं, पाकिस्तानचे एक प्रतिनिधी मंडळ सध्या लंडनला गेलें आहे. पाकिस्तान आणि ऑस्ट्रिया ह्यांच्यांत राजनैतिक संबंध जोडले गेलेले नाहींत.

### चार राज्यांचीं ९ कोटी रुपयांचीं कर्जें

मुंबई, मद्रास, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश ह्या चार राज्यांचीं सरकारें लवकरच कर्जें उभारणार आहेत. मुंबई व मद्रास ह्यांस प्रत्येकीं ३ कोटी रुपये हवे आहेत. उत्तर प्रदेश २ कोटी व मध्य प्रदेश १ कोटी रुपये मागत आहे. ३ टक्के व्याज, ९९ रु. किंमत व १९६० मध्यें परतफेड अशा अटी रहातील असें समजतें.

### १·३३ कोटी रु., का २·३९ कोटी रु. ?

मद्रास इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशनचा व्यवहार मद्रास सरकारनें ऑगस्ट १९४७ मध्यें आपल्याकडे घेऊन कॉर्पोरेशनला त्याची किंमत म्हणून १·३३ कोटी रुपये दिले. कॉर्पोरेशनचें म्हणणें, तिच्या जिंदगीची किंमत २·३९ कोटी रुपये आहे. ह्या संबंधांतील वाटाघाटी फिसकटल्या असून, सरकार आतां इंडियन इलेक्ट्रिसिटी ॲक्टाप्रमाणें ह्या तंट्याचा निर्णय पंचाकडे सोपविणार आहे.

### दि राजाबहादुर मोतिलाल पूना मिल्स लि.

वरील कंपनीस १९४८ मध्यें ५,७६,४९८ रु. नफा झाला होता, परंतु १९४९ मध्यें घसारा न काढतांहि कंपनीनें २,६४,१३२ रु. तोटा दाखविला आहे. १ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर १९४९ अखेर, माल पडून राहिल्यामुळें, गिरणी बंद होती. कंपनीचें वसूल भांडवल २८,२१,००० रु. असून रिझर्व्ह ५,५०,००० रु. आहे.

### टाटा कंपनीचीं ट्रान्स्फर बुकें

टाटा आयर्न अँण्ड स्टील कंपनीचीं ट्रान्सफर बुकें २१ जुलै पासून ऑगष्ट अखेर बंद रहातील.

### दैनिकें व त्यांचा खप

ग्रेट ब्रिटनमध्यें प्रत्येक १,००० लोकसंख्या दररोज ५७० दैनिकें विकत घेते. त्याच्या खालोखाल नॉर्वे (४७२), लक्झेंबर्ग (४४५), ऑस्ट्रेलिया (५३८), डेन्मार्क (४०३), स्वीडन (४८२), न्यूझीलंड (३७४), अमेरिका (३५७), व रशिया (१६१) असा अनुक्रम लागतो. सबंध जगांत दररोज २१,८०,००,००० दैनिकें खपतात.

---


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

# नोटीस

या बँकेच्या सन १९५०–५१ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठीं वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा कचेऱ्यांत नोटीस बोर्डावर निवडणुकीच्या नियम नंबर ३ प्रमाणें लावली आहे. तरी निवडणुकीसाठीं लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवाराच्या लेखी संमतीनें तारीख १० ऑगस्ट १९५० रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावीत. सदरबाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीच्या वेळांत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर, मो. वि. खडे,
ता. १४ जुलै १९५० मॅनेजिंग डायरेक्टर.

## बँकेंतील बनावट सह्या

### कारकून दोषमुक्त झाला

हबीब बँकेच्या महंमदअली रोड (मुंबई) शाखेचा लेजर कीपर वहिदअली गुलामअली जव्हेरी, ह्याचेवर ग्रेटर बॉम्बेच्या सेशन्स कोर्टांत बनावट कागदपत्र करण्याबाबत खटला चालू होता. ज्यूरीच्या बहुमतास मान देऊन जज्जानें आरोपीस दोषमुक्त ठरविलें. खटल्याची हकीकत उद्बोधक आहे.

सरकारी वकिलाच्या म्हणण्याप्रमाणें, आरोपीनें बँकेंत ५ जुलै १९४८ रोजीं एका खोट्या नांवानें चालू खातें उघडविलें. दोन दिवसांनीं त्यांत ७४ रुपये भरले. चिफ कॅशिअरनें पेइंग-इन-स्लिप तपासल्यावर आरोपीनें स्लिप काढून घेऊन तिचेवरील ७४ रुपयांचे ७,४०० रुपये केले. पोस्टिंगकरतां दुसऱ्या लेजर कीपरकडे जेव्हां ही स्लिप गेली त्याच वेळीं ह्या खात्यावर काढलेला ४,००० रुपयांचा बेअरर चेक दाखल करण्यांत आला आणि ती रक्कम बँकेनें दिली. हिशेब जमत नसल्याचें संध्याकाळीं आढळून आलें आणि मॅनेजरनें पोलिसास वर्दी दिली. पेइंग-इन-स्लिपवरील दुरुस्ती व चेकवरील हस्ताक्षर हीं एकाचींच असलीं पाहिजेत, असें मॅनेजरास पुढें आढळून आलें. हा मनुष्य म्हणजे, ज्यानें दोन वर्षांपूर्वी आरोपीच्यातर्फे रजेचा अर्ज लिहिला होता, तोच मनुष्य, आरोपीस पकडलें तेव्हां त्याचे घरीं १०० रुपयांच्या ४० नोटा सांपडल्या. २,००० रुपये छपराच्या तुळईतील एका भोकांत, ५०० रुपये खिडकीच्या पोकळींत व बाकीचे ट्रंकेंत होते. ह्याच दिवशीं आरोपीच्या सेव्हिंग्ज खात्यांत १ रु. ५ आ. होते. करंट अकाउंट उघडण्याच्या अर्जावर ओळख देणाराची सहीहि बनावट असल्याचें आढळलें. "घरीं सांपडलेली रक्कम माझ्या खाजगी बचतीपैकीं आहे, खोटें खातें उघडण्याशीं माझा कांहीं संबंध नाहीं" असा आरोपींचा बचाव होता. आरंभीं सांगितल्याप्रमाणें आरोपी निर्दोषी झाला.

---

**टाटा कंपनीचे नोकर हिन्दी शिकणार**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनींतील ज्या नोकरांना ४०० रु. किंवा अधिक मासिक वेतन असेल त्यांनीं जुलै १९५२ पर्यंत हिंदी शिकावें असें सुचविण्यांत आलें आहे. हिंदी ही भारताची राजभाषा झाल्यामुळें आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं आपल्या व्यवहारांत तीच वापरण्याचें ठरविल्यामुळें कंपनीनें आपल्या वरिष्ठ नोकरांना हिंदी शिकविण्याचें ठरविलें आहे.

**विजेच्या पुरवठ्यांत कपात**—महाराष्ट्रांत ७ जुलैपर्यंत पावसाळा सुरू झालेला नव्हता. त्यामुळें भाटघर येथील तलावाच्या पाण्याची उंची बरीच कमी झाली होती. ह्या धरणावर उत्पन्न होणाऱ्या विजेचा पुरवठा भोर, निरा, लोणंद, शिरवळ व नसरापूर येथील कारखान्यांना करण्यांत येत असतो. परंतु पावसाच्या अभावामुळें त्यांच्या विजेच्या पुरवठ्यांत कपात करावी लागली असती. ७ तारखेपुढील १०–१२ दिवसांत भरपूर पाऊस न झाल्यास वरील गांवांतून विजेचे दिवेहि बंद होण्याचा संभव होता.

**बँक ऑफ इंडियाचा नफा**—ता. ३० जून १९५० रोजीं संपलेल्या सहा महिन्यांत बँक ऑफ इंडियाला ३५,९५,८५९ रु. १ आणा ३ पै नफा झाला. ह्यावर कराची आकारणी व्हावयाची आहे. बँकेचें वसूल भांडवल २,००,००,००० रु. आहे. ह्या भांडवलावर १२ टक्के इंटेरिम डिव्हिडंड देण्यासाठी बोर्डानें १२ लाख रु. मंजूर केले आहेत. हा नफा दर भागामागें करमाफ ३ रु. पडतो.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर व पौड**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

**मो. वि. खडे**
मॅनेजिंग डायरेक्टर



# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर — म. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.

### तोटा झालेल्या गिरण्यांनीं बोनस द्यावा काय?

मुंबईच्या गिरणी-कामगारांना बोनस देण्यासंबंधीं इंडस्ट्रिअल कोर्टानें जो निवाडा दिला आहे त्याविषयीं असंतोष व्यक्त करणारें पत्रक समाजवादी पुढारी श्री. अशोक मेहता ह्यांनीं काढलें आहे. श्री. मेहता म्हणतात, "बोनस देण्यासंबंधीं एक नवीनच तत्त्व कोर्टानें काढलें आहे. ज्या गिरण्यांनीं सरासरी नफ्यापेक्षां अधिक नफा कमावला आहे त्यांनीं बोनस सरासरी प्रमाणांत द्यावयाचा आहे. परंतु ज्या गिरण्यांना नफा झालेला नाहीं त्यांना मात्र बोनस देण्यापासून मुक्त करण्यांत आलें आहे. सर्व गिरण्यांचा साकल्यानें विचार करून त्या सर्वांच्या सरासरी नफ्यांतून बोनस वांटण्याची पद्धत सोडून देण्यांत आली आहे."

ज्या गिरण्यांना नफा झाला नाहीं, त्यांना बोनसच्या जबाबदारीतून मुक्त करण्याच्या निर्णयामुळें अहमदाबादमधील कांहीं गिरणी मालकांची भीति नाहींशी झाली आहे. अशा कांहीं गिरण्यांनीं मिल ओनर्स असोसिएशनमधून आपलें अंग काढून घेतलें होतें. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. चंदुलाल पारिख ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, बोनस हा नफ्यावर आधारला असल्यामुळें ज्या गिरण्या तोट्यांत चालतात त्यांच्यावर त्याची सक्ती करणें न्याय्य होणार नाहीं.

---

### ठेवीदारांचें व भागीदारांचें १२ कोटींचें नुकसान

आसाम कोऑपरेटिव्ह अपेक्स बँक लि. ह्या बँकेच्या कारभारासंबंधीं स्थानिक वृत्तपत्रांतून कांहीं आरोप करण्यांत आले होते. ह्या बँकेला सरकारचा पुरस्कार लाभलेला आहे. आसाम सरकारचे पार्लमेंटरी सेक्रेटरी श्री. बिमल प्रसाद चालिहा ह्यांनीं वरील आरोपासंबंधीं खुलासा करतांना म्हटलें आहे कीं, बँकेवर करण्यांत आलेले आरोप निराधार आहेत. बँकेला इंपीरियल बँकेचें कांहींहि देणें नाहीं. अपेक्स बँकेकडून सहकारी संस्थांनीं घेतलेलीं कर्जें त्यांना फेडतां आलीं नाहींत हेंही म्हणणें खोटें आहे. आसाम सरकारनें टेक्सटाइल ट्रेडिंग स्कीमसाठी इंपीरिअल बँकेकडून ३॥ कोटी रु. कर्ज घेतलें होतें. त्यांपैकीं ३,१०,००,००० रुपयांची परतफेड करण्यांत आली आहे. उरलेल्या कर्जाला तारण म्हणून कापडाचा सांठा शिल्लक असून त्याच्या विक्रीबद्दलचे करारही झाले आहेत. भारत सरकारचें कापडविषयक बदललेलें धोरण आणि वहातुकीची अडचण ह्यामुळें माल तात्पुरता पडून राहिला होता. परंतु जुलै अखेर तो खपेल असा अंदाज आहे. श्री. चालिहा ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं, आसाममधील पुष्कळशा बँका बंद पडल्यामुळें ठेवीदारांचें आणि भागिदारांचें सुमारें १२ कोटी रुपये बुडाले असावे. ही माहिती सरकारनें अधिकृत रीत्या जाहीर केलेली नाहीं.

---

### डॉ. डुवेल ह्यांचेशीं चर्चा

मिनेसोटा (यू. एस. ए.) विद्यापीठांतील शेतकी अर्थशास्त्राचे प्रोफेसर, डॉ. ऑस्टिन डुवेल, ह्यांनीं सोमवारीं दि. १० जुलै रोजीं मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट व मुंबई प्रां. सहकारी बँक ह्या संस्थांना भेट दिली व तेथील पदाधिकाऱ्यांशीं त्यांनीं भारताच्या शेतीच्या आर्थिक प्रश्नांची चर्चा केली.

---

### नेदरलॅंडस बँकेचें नामांतर

नेदरलॅंडस इंडिया कमार्शिअल बँक (Nederlandsch Indische Handelsbank N. V.) १४ जुलै १९५० पासून नॅशनल कमर्शिअल बँक (Nationale Handelsbank N. V.) ह्या नांवानें ओळखली जाईल. नेदरलंड सरकारनें १८ मार्च १९५० रोजीं ह्या नामांतरास संमति दिली आहे.


**बेडेकर लोणच्याचा तयार मसाला**

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दी

**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## युद्ध परिस्थिति व अगदी अलिकडची परिस्थिति यांचे आवास गांवावर परिणाम

( भा. म. काळे )

गेल्या आठ दहा वर्षांत दुसऱ्या महायुद्धानें निर्माण झालेली परिस्थिति व तदनंतरची गेल्या पांच वर्षांतील युद्धोत्तर काळांतील परिस्थिति यांचा परिणाम हिंदच्या अर्थव्यवहारावर झाला आहे. आर्थिक परिस्थितींतील दोष लक्षांत घेऊन ते दूर करण्याकडे सरकारचें व इतर जबाबदार लोकांचें लक्ष वेधलें आहे. हिंदमध्यें ५ लक्ष खेडीं असून ग्रामीण जनतेच्या उन्नतीचा प्रश्न आपल्याकडे विशेष महत्त्वाचा आहे. मुंबई नजीकच्या खेडेगावांत अलिकडे परिस्थिति कोणत्या स्वरूपाची आहे व खेडेगावांत कोणते निश्चित प्रश्न निर्माण झाले आहेत याची कांहींशी कल्पना पुढें दिलेल्या 'आवास' या कुलाबा जिल्ह्यांतील गांवाच्या परिस्थितीवरून करतां येण्यासारखी आहे. प्रस्तुत लेखकाचा गेलीं १० वर्षें या गांवाशीं थोडासा मे किंवा इतर सुटीच्या वेळीं प्रसंगवशात होणाऱ्या वास्तव्यामुळें संबंध आला आहे. या गावांत दिसून आलेली परिस्थिति नमुनावजा ( सँपल सर्व्हे प्रमाणें ) उद्बोधक वाटल्यामुळें व कांहींशी प्रातिनिधिक स्वरूपाची असल्यामुळें ती थोडक्यांत पुढें दिली आहे.

आवास हें सुमारें १,८५० लोकवस्ती असलेलें गांव मुंबई नजीक आलिबाग तालुक्यांत समुद्रकिनाऱ्यावर आहे. मुंबईला येथून मोटार-बोट मार्गानें दोनतीन तासांत पोंचतां येतें व दळणवळण सर्व वर्षभर चालू असतें. हा गांव मुळचा चौकळशी व माळी या शेती करणाऱ्या लोकांचा. गेल्या १५० ते २०० वर्षांत येथें ब्राह्मण वस्तीला सुरवात होऊन सध्यां ब्राह्मणांचीं सुमारें चाळीस घरें आहेत. मुंबईपासून जवळ असल्यामुळें नोकरी किंवा इतर व्यवसाय करण्यासाठी येथें राहणारांची संख्या फार मोठी आहे. गांवांत भातशेतीची जमीन सुमारें ६५० एकर असून भात हें मुख्य पीक व कांहीं ठिकाणीं हिंवाळ्यांत वालाचें पीक काढलें जातें. " अधिक धान्य पिकवा " या मोहिमेला या गांवांत जवळ जवळ अवसर नाहीं, कारण पडीत जमीन नाहीं किंवा लागवडीस आणतां येईल अशीहि जमीन जवळ जवळ नाहीं. तरी पण भाताचें चांगलें बी–बियाणें वापरून व जमिनीला योग्य प्रमाणांत खत घालून पीक निदान १० टक्के तरी वाढवितां येईल. परंतु या दोन्हीं बाबतींत मुख्य अडचण पैशाची आहे. गेलीं तीस वर्षें तोंडलीं पिकवून तीं विक्रीसाठीं पाठविणें हा एक नवीन धंदा सुरू झाला आहे व सुमारें ५० लोक हा धंदा करीत आहेत. विक्रीमालाच्या दृष्टीनें चिंचेचें उत्पन्न थोडेसें आहे व खाजगी रीत्या चिंच थोडीशी विकली जाते. गावांतील बागायतीचें उत्पन्न थोडेसें वाढवितां येण्यासारखें आहे.

कूळकायद्याचे निश्चित परिणाम या गांवावर झालेले आढळून येतात. खंडानें शेत करणारांची स्थिति त्यांचें वार्षिक उत्पन्न वाढल्यामुळें व भाताला गेलीं तीस वर्षें रु. १८० ते २०० इतका खंडीचा भाव असल्यामुळें निश्चित सुधारली आहे. मंदीच्या काळांत भाताचा भाव खंडीला रु. २० इतका उतरला होता. कुळांची स्थिति सुधारली असली तरी ब्राह्मण मालक वर्गाची स्थिति वाईट झाली आहे. कारण निव्वळ शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून राहातां येत नाहीं. मजुरीचे दरहि पांच पट वाढले असल्यामुळें घरीं शेती करणारा ब्राह्मणवर्ग बराच होता, आतां हा वर्ग हळू हळू संपुष्टांत येत आहे. सावकार नियंत्रण कायद्यामुळें अनेक वर्षें चालू असलेला सावकारीचा धंदा एका गृहस्थांना बंद करावा लागला, व इतर लोकांनीहि आपले देण्याचे किरकोळ व्यवहार बंद केले. शेतकरी वर्गाला उसनवार किंवा कर्जाऊ पैसे मिळणें शक्य होत नाहीं. गांवांत गेलीं दोनतीन वर्षें सहकारी पतपेढी सुरू झाली आहे. या पतपेढीनें सुमारें ६॥ हजारांच्या रकमा कर्जाऊ दिल्या आहेत, परंतु यापैकीं ५० टक्के रकमा मुदतीबाहेर जाऊन त्या वसूल करणें फार कठीण जात आहे. येथील पतपेढी सभासदाला स्वतःच्या पतीवर फक्त ३० रु. कर्ज देते. याहून जास्त रकमा गहाणावर दिल्या जातात. गावांत एक तळें आहे. तें जास्त खोल खणल्यास पाणीपुरवठ्याची अडचण भासणार नाहीं. १९४२ सालीं पाण्याच्या दुष्काळामुळें असा थोडासा प्रयत्न करण्यांत आला होता. समुद्रकिनाऱ्यावर किहीमच्या खाडीजवळ खडक फोडून बांध घालून, आसपासच्या एका टोंकाला मच्छीमारीच्या होड्या लागूं शकतील या दृष्टीनें बांधकाम चालू आहे. तें पुढील वर्षी पुरें झाल्यावर मच्छीमारीचा व्यापार वाढूं शकेल. विशेष प्रयत्नांनींच भातशेती, बागाईत व मच्छीमारी यांचें उत्पादन १० टक्क्यांनीं वाढेल अशी परिस्थिति आहे. मात्र १५ ते २० हातमागांचा कारखाना येथें कोणीही काढल्यास चालूं शकेल असें वाटतें. गांवांत प्राथमिक शिक्षणाची पूर्ण शाळा असून, सुमारें १२५ मुलें असलेलें हायस्कूल गेलीं ५।६ वर्षें आहे. नवीन कायद्याप्रमाणें ८९६ लोकांना मतदानाचा हक्क मिळणार आहे, त्यापैकीं ५२५ लोक निरक्षर आहेत.

गांवांत गुरांची संख्या सुमारें तीनशें आहे. पुष्कळशा शेतकऱ्यांच्या स्वतःच्या बैलगाड्या आहेत. सात आठ लोक भाड्यानें गाडी देण्याचा धंदा करितात. दुधाचा पुरवठा साधारण आहे, परंतु एप्रील–मे महिन्यांत टंचाई जाणवते. गांवांत दीड मैल लांबीचा चांगला गाडी रस्ता आहे. गावांत एक आयुर्वेदिक डॉक्टर आहे व वैद्य आहे. त्यांचा धंदा बरा चालतो. सुतार व लोहार यांना या गावांत जास्त काम मिळण्याची शक्यता दिसते. पिठाची गिरणी साधारणपणें येथें चालूं शकेल. सावकार नियंत्रण व कुळसंरक्षण कायदा यामुळें गांवांतील कांहीं लोकांनीं शेतकऱ्यांना दिलेलीं सुमारें रु. १० हजार पर्यंतचीं कर्जें आज बुडालीं असावीं असा अंदाज आहे. दोन मैलांवर असलेल्या किहीमला दर मंगळवारीं आठवड्याचा बाजार भरतो. या गावांत बेने इस्रायल लोकांचीं सात-आठ घरें आहेत. तेल गाळणें हा यांचा मुख्य धंदा. मुंबईचें सान्निध्य व साधारण बरी हवा यामुळें गेल्या दहा वर्षांत १०-१२ सुखवस्तू कुटुंबें मुंबईहून येऊन येथें स्थायिक झालीं आहेत. हायस्कूल निघाल्यामुळें गावाचें महत्त्व थोडें वाढलें आहे, व नजीकच्या एका मैलावरील सासवने गांवांत सरकारनें स्त्रियांचें ट्रेनिंग कॉलेज गेल्या वर्षापासून सुरू केलें आहे ही एक प्रगतीची गोष्ट आहे. दरवर्षी कार्तिक महिन्यांत भरणाऱ्या गावांतील नागोबाच्या जत्रेला हजारो लोक येतात व व्यापारी दृष्टीनें या जत्रेला महत्त्व असतें. प्राथमिक शाळेंत २०० मुलें शिक्षण घेत आहेत. शेतकरी वर्गाला 'बैल' व 'पेंड' यांच्या किंमती विशेष महाग वाटतात.

नवीन कायद्याप्रमाणें गांवांत ग्रामपंचायत स्थापन करतां येणें शक्य आहे. स्वच्छता ठेवणें, कांहीं पायवाटा दुरुस्त करणें, रीडिंग रूम सुरू करणें, या गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. शेतकरी लोकांच्या गरजा वाढल्या आहेत. त्यांच्या कपडे वापरण्याच्या पद्धतींत सुधारणा आहे. शिक्षणाकडेहि त्यांचें जास्त लक्ष वळलें आहे.

या गावाचें जीवन कांहीं प्रमाणांत मुंबईवर अवलंबून असल्यामुळें मुंबईला नोकरीसाठीं जाण्याची प्रवृत्ति विशेष दिसून येते.

शेतकरी वर्गाची आर्थिक परिस्थिति गेल्या १० वर्षांत निश्चित सुधारली आहे, परंतु कोणत्याहि क्षेत्रांत जबाबदारीची जाणीव या वर्गांत नाहीं. पैशाची थोडीशी मदत, पाणीपुरवठ्यांत सुधारणा व उद्योगतत्परता यांनींच गावाची परिस्थिति थोडीशी सुधारूं शकेल. हातमागांचा लहानसा कारखाना या गावांत चालेल त्याचप्रमाणें मसाल्याचे पदार्थ तयार करून विक्रीला बाहेर पाठविणें हा बैठा उद्योगधंदा या गावांत चालेल. या नवीन विचारांनीं कार्य करणाऱ्या दोन कार्यकर्त्यांची (कीं ज्यांना पैशाचेंहि थोडेंसें पाठबळ असेल) या गावाला जरूरी आहे. गावांत पोस्ट ऑफिस असून सुमारें १०० लोकांचीं सेव्हिंग बँकेंत खातीं आहेत. 'अधिक धान्य पिकवा' याला या गावांत अगदींच मर्यादित क्षेत्र असलें तरी सहकारी चळवळ, बैठे उद्योगधंदे व जबाबदारीची जाणीव निर्माण करणें या दृष्टीनें प्रयत्न करतां येण्यासारखे आहेत.

# भारतांतील "वनस्पती" चा धंदा

१९४९ अखेर भारतांत वनस्पतीचे एकूण ४२ कारखाने चालू होते आणि त्यांत १,५०,००० टनांची निर्मिती झाली. वास्तविक, त्यांची उत्पादनक्षमता ३,३०,००० टनांची होती. आणखी १७ कारखान्यांच्या उभारणीचें काम चालू होतें. हे कारखाने सुरू झाले, म्हणजे एकूण उत्पादनक्षमता ८२,५०० टनांनीं वाढेल. १९५० अखेर ४,००,००० टन वनस्पतीचें उत्पादन होऊं शकेल, अशी अपेक्षा आहे. वनस्पतीच्या धंद्यानें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारास १९४५ ते १९४८ ह्या चार वर्षांत वेगवेगळ्या स्वरूपांत किती रक्कम दिली त्याचा तपशील खालीं दिला आहे:—

**मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस वनस्पतीच्या धंद्याकडून मिळालेली रक्कम.**

| | १९४५ | १९४६ | १९४७ | १९४८ |
|---|---|---|---|---|
| उत्पादन (टन) | १,३२,६२७ | १,३८,५१६ | ९६,१६० | १,२७,६६४ |
| | रु. | रु. | रु. | रु. |
| इनकम टॅक्स ... | १,२४,७५,५०० | ९२,८९,००० | ६१,२६,००० | ५३,३३,००० |
| एक्साइज ... | १,२४,२१,००० | १,३६,२१,००० | १,०२,१५,००० | १,७२,२४,००० |
| रेल्वे भाडें ... | ८५,६५,००० | ९७,६४,००० | ७४,५७,००० | ९५,७१,००० |
| विक्रीकर ... | ६२,१०,००० | ६८,१०,००० | ५१,०७,००० | ८६,११,००० |
| म्यु. पट्टया लायसेन्स फी इ. ... | ५,४८,००० | ७,२२,००० | ९,४८,००० | २०,९१,००० |
| एकूण रुपये | ४,०२,१९,००० | ४,०२,०६,००० | २,९८,५३,००० | ४,२८,३०,००० |

**कारखान्यांची देशभर वाटणी**

| | चालू कारखाने | उत्पादन क्षमता | उभारणी चालू असलेले कारखाने | त्यांची उत्पादन क्षमता | एकूण कारखाने | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संख्या | उत्पादनक्षमता |
| | | टन | | टन | | टन |
| पू. पंजाब, दिल्ली, यू. पी. ... | ७ | ६४,५१० | १ | ३,००० | ८ | ६७,५१० |
| प. बंगाल, बिहार, ओरिसा ... | ७ | ५५,७६० | २ | १५,००० | ९ | ७०,७६० |
| मध्यभारत, सी. पी., वऱ्हाड हैद्राबाद ... | ३ | २७,००० | ३ | १३,५०० | ६ | ४०,५०० |
| मुंबई, सौराष्ट्र ... | १५ | १,४३,९०० | ५ | २४,००० | २० | १,६७,९०० |
| मद्रास, कोचीन, म्हैसूर ... | १० | ३९,६०० | ६ | २७,००० | १६ | ६६,६०० |
| एकूण | ४२ | ३,३०,७७० | १७ | ८२,५०० | ५९ | ४,१३,२७० |

वनस्पतीच्या धंद्यांत एकूण सुमारें २२½ कोटी रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे. त्या धंद्यांत सुमारें १५,००० कामगार प्रत्यक्षपणें कामावर आहेत.

हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.